मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२

www.newsexpressmarathi.in » पुणे, पिंपरी-चिंचवड » सोमवार, दिनांक २० नोव्हेंबर २०२३। पान १


# छठ महापुजा निमित भव्य गंगा आरती भाविकांची अलोट गर्दी

## विविध, धार्मिक, सामाजिक, प्रबोधनात्मक कार्यक्रमांचे आयोजन

**मोशी।**
**न्यूज एक्स्प्रेस मराठी।**
विश्व श्रीराम सेनेच्या वतीने मोशी येथे इंद्रायणी नदीच्या तीरावर रविवारी (दि.१९) सायंकाळी 'भव्य काशी गंगा आरती'चे आयोजन करण्यात आले होते. भक्ती भावपूर्ण वातावरणात इंद्रायणी मातेची यावेळी काशी येथून आलेल्या पौरोहित्यांनी विधिवत आरती केली. यावेळी पालघर हिंदूशक्ती पीठ येथील स्वामी श्री भारतानंद सरस्वती महाराज, विश्व हिंदू परिषदेचे सहमंत्री शंकर गायकर, समस्त हिंदू आघाडीचे संस्थापक मिलिंद एकबोटे, आमदार महेश दादा लांडगे, भाजपा प्रदेश उपाध्यक्ष राजेश पांडे, राष्ट्रीय मागासवर्ग आयोगाचे



महाराष्ट्र राज्य समन्वयक अर्जुन गुप्ता, भारतीय खाद्य महामंडळ महाराष्ट्र सल्लागार समिती सदस्य व विश्व श्रीराम सेनेचे राष्ट्रीय अध्यक्ष संयोजक डॉ. लालबाबू अंबीकलाल गुप्ता, माजी नगरसेवक धनंजय आल्हाट, सुरेश म्हेत्रे, हभप शेष महाराज, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे विशाम कुलकर्णी, अनिल उपाध्ये, चंद्रकांत तापकीर, गणेश आंबेकर, उमेश सिंगआर्दीसह हजारो उत्तर भारतीय भक्त भाविक उपस्थित होते. राष्ट्रीय एकतेतून राष्ट्र विकास हे ध्येय ठेवून विविध सामाजिक व धार्मिक उपक्रमासह विश्व श्रीराम सेना ही संस्था छठ महापुजा निमित्त भव्य गंगा आरतीचे आयोजन करीत असते. या महोत्सवाची सांगता सोमवारी पहाटे पाच वाजता सूर्योदय झाल्यानंतर सूर्याला अर्ध्य देऊन होणार आहे. सुर्यषष्टी महाव्रत महापूजा, छोटकी छट, भव्य गंगा आरती सह विविध, धार्मिक, सामाजिक, प्रबोधनात्मक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.

सूर्याची उपासना करण्यासाठी छटपूजेचे व्रत केले जाते. सर्व मनोकामना पूर्ण करणारे हे व्रत असल्याचे प्राचीन काळापासूनची सामाजिक धारणा आहे. निसर्गात आणि समाजात एकरूपता साधणार्या या व्रतात, आस्था, प्रेम, विश्वास, त्याग आणि पर्यावरण प्रति समर्पणाची भावना आहे अशी माहिती लालबाबु गुप्ता यांनी दिली. यावेळी संजय सम्राट म्युझिकल ग्रुप यांनी धार्मिक गीते सादर केली.संयोजनात श्याम गुप्ता, उमेश सिंग, मुन्ना सिंह, राजकुमार गुप्ता, विनोद गुप्ता, माधव गुप्ता, पप्पू गुप्ता, राजकुमार प्रसाद, संजय विश्वकर्मा आदींनी सहभाग घेतला होता.

# जलाराम बाप्पाची मिरवणूक मोठ्या उत्साहात साजरी

## श्री छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेलाही पुष्पहार घालून पूजन

**पिंपरी-चिंचवड**
**न्यूज एक्स्प्रेस मराठी।**
आळंदी येथे श्री जलाराम सत्संग मंडळाच्यावतीने जलाराम बाप्पाची २२४ वी जयंती मोठ्या उत्साहात व आनंदात साजरी करण्यात आली. या जयंतीनिमित्ताने जलाराम सत्संग मंडळाच्या वतीने जलाराम बाप्पाच्या प्रतिमेची मिरवणूक श्री संतोषी माता मंदिर आळंदी या ठिकाणाहून बँड बाज्याच्या निनादात निघाली. या मिरवणुकीत गुजराती बांधव आणि भगिनी यांनी वाद्यांच्यातालासुरात गुजराती नृत्य व दांडिया नृत्य केले. या मिरवणुकीत जलराम मंडळाचे भूतपूर्व अध्यक्ष व मंदिराच्या निर्मितीचे प्रमुख मगनलालजी राजा यांची प्रतिमाही ठेवण्यात आली होती. या मिरवणुकीने शहरातील ग्रामस्थांची मने वेधून घेतली. या मिरवणुकीचे स्वागत व जलाराम बाप्पाच्या प्रतिमेची पूजन आळंदी पोलीस स्टेशनच्या वतीने वरीष्ठ पोलीस निरीक्षक सुनील गोडसे व पोलीस आधिकारी मच्छिंद्र शेंडे यांच्या शुभहस्ते करण्यात आले. तदनंतर नगरपालिका चौकात आळंदी नगरपालिकेचे माजी नगराध्यक्ष तसेच जैन संघ आळंदीचे अध्यक्ष व ज्ञानेश्वर शिक्षण



संस्थेचे विद्यमान अध्यक्ष सुरेश काका वडगांवकर यांनी मिरवणुकीचे स्वागत करून जलाराम बाप्पाच्या प्रतिमेचे पुष्पहार घालून पूजन केले. तसेच नगरपालिकेतील श्री छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेलाही पुष्पहार घालून पूजन केले. तसेच जलाराम सत्संग मंडळाच्या विश्वस्तांचा फेटा बांधून सत्कार करण्यात आला. तदनंतर ही मिरवणूक पुढे माऊलींच्या प्रवेशद्वाराजवळ आली. त्या ठिकाणी ज्ञानेश्वर महाराज संस्थान च्या वतीने माऊली वीर यांनी मिरवणुकीचे स्वागत करून जलाराम बाप्पांच्या प्रतिमेचे पुष्पहार घालून पूजन केले. मंडळाच्या वतीने माऊलीच्या समाधीला पुष्पहार अर्पण करण्यात आला.याप्रसंगी श्री ज्ञानेश्वर शिक्षण संस्थेचे सचिव अजित वडगावकर , शारदाताई वडगावकर (माजी नगराध्यक्षा आळंदी,तसेच अनिल वडगावकर, नंदकुमार वडगावकर( आळंदी काँग्रेस शहराध्यक्ष) तसेच वडगावकर कुटुंबीय या मिरवणुकीत सहभागी झाले होते आळंदी शहरात नेहमीच गोरगरिबांना तसेच आळंदीतील वारकरी सांप्रदायातील गरजूंना मोठ्या उत्साहाने व आनंदाने अनेक वर्षे अन्नदान करणारे हे जलाराम सत्संग मंडळ समाजसेवेच्या कार्यामध्ये सुद्धा अग्रस्थानी आहे. आळंदी शहरात वारकरी व ग्रामस्थ तसेच पंचक्रोशीतील वयोवृद्ध व्यक्तींच्या डोळ्यांसाठी मोफत उपचार करणारे व वेळप्रसंगी डोळ्याचे मोफत ऑपरेशन करणारे जलाराम सत्संग मंडळ पुणे जिल्ह्यात प्रसिद्ध आहे. हे जलाराम सत्संग मंडळ नेहमीच समाजसेवेचे व्रत धारण करत आलेले आहे. आणि अशा या जलाराम बाप्पाच्या भव्य मिरवणुकीत महाराष्ट्रातून गुजराती बांधव जलाराम बाप्पांचे भक्त वआळंदीचे ग्रामस्थ मोठ्या उत्साहाने सहभागी झाले. तदनंतर या मंडळाच्या वतीने महाप्रसादाचे वाटप करण्यात आले.

# हवेची गुणवत्ता कायम टिकवून ठेवण्याचे आव्हान

## विविध ठिकाणी बांधकामे सुरू; रस्त्यांवरही धूळ

**पिंपरी | न्यूज एक्सप्रेस मराठी।**

हवेतील गुणवत्तेची पातळी गंभीर असल्याने महापालिकेने शहरातील बांधकाम व प्रक्रियेवर निर्बंध लागू केले होते. रविवारपर्यंत (ता. १९) बांधकामे थांबविण्याचा आदेश १३ नोव्हेंबरला दिला होता. मात्र, हवेची गुणवत्ता सुधारल्याने शुक्रवारी (ता. १७) आदेश मागे घेऊन महापालिका आयुक्त शेखर सिंह यांनी बांधकामे सुरू करण्यास परवानगी दिली होती. मात्र, शहराच्या विविध भागात सुरू असलेली बांधकामे व रस्त्यांवरील खड्ड्यांमुळे उडणारी धूळ पाहता यापुढील काळात हवेची गुणवत्ता कायम टिकवून ठेवण्याचे आव्हान प्रशासनावर आहे.

उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने महापालिकेला ग्रेडेड रिस्पॉन्स ॲक्शन प्लॅन आखून अंमलबजावणी करण्याचे पत्र दिले होते. त्यानुसार आयुक्त शेखर सिंह यांनी १३ नोव्हेंबर रोजी आदेश काढून १९ नोव्हेंबरपर्यंत शहरातील सर्व बांधकामे बंद ठेवण्याचा आदेश दिला होता.



त्यानुसार मुख्य हॉटस्पॉट आणि जंक्शनवर पाणी शिंपडणे आणि फॉगिंग उपक्रम तीव्र करून एअर क्वालिटी इंडेक्स कमी करण्यासाठी परिश्रमपूर्वक उपाययोजना केल्या होत्या. त्यामुळे हवेच्या गुणवत्ता पातळीत सुधारणा झाल्याचा व 'गंभीर' पातळीपेक्षा लक्षणीय घट झाल्याचा दावा करत आयुक्तांनी निर्बंध मागे घेतले होते. तसेच, नागरी क्षेत्रातील मर्यादेत काम पुन्हा सुरू होऊ शकते. तथापि, बांधकाम कंपन्यांना हवेच्या गुणवत्तेच्या पातळीबाबत

> **महापालिका पर्यावरण विभागाने हवा प्रदूषणावर नियंत्रण ठेवण्यासाठी पथके नियुक्त केले आहेत. त्या भागात पाणी शिंपडणे आणि फॉगिंग उपाय सुरू ठेवणे आवश्यक आहे. आदेशाची अंमलबजावणी निश्चित करण्यासाठी वा कोणत्याही उल्लंघनासाठी महापालिकेची पथके त्यांच्या संबंधित प्रभागांवर सतत देखरेख ठेवत आहेत.**
> **- शेखर सिंह, आयुक्त तथा प्रशासक, महापालिका**

जागरूक राहण्याचे निर्देशही दिला होता. एक्युआय पातळीमध्ये कोणतीही बिघाड टाळण्यासाठी योग्य उपायांची अंमलबजावणी सुरू ठेवण्यासही सांगितले आहे. हवेमध्ये नायट्रोजन, ऑक्सिजन, कार्बन डायऑक्साइड, कार्बन मोनाऑक्साइड, सल्फर डायऑक्साईड असते. विशेषतः वाहने, कंपन्या अशा ठिकाणच्या वेगवेगळ्या इंधनांच्या ज्वलनातून कार्बन डायऑक्साईड, कार्बन मोनाऑक्साइड, सल्फर डायऑक्साइड व नायट्रोजनचे विविध ऑक्साइड वातावरणात पसरतात. हे घटक हवा प्रदूषित करतात. त्याचा जीवसृष्टीवर विपरीत परिणाम होतो. सल्फर डायऑक्साईड : उद्योग व घरगुती वापरासाठी आवश्यक असलेली ऊर्जा मिळण्यासाठी लाकूड, कोळसा, पेट्रोलियम पदार्थ वापरले जातात. त्यांच्या ज्वलनातून सल्फर डायऑक्साइड निर्माण होते. त्याचा परिणाम श्वसननलिका व श्वसनक्रियेवर परिणाम होतो.- नायट्रोजन ऑक्साइड : अतिउच्च तापमानावर अर्थात एक हजार अंश सेल्सियसपेक्षा अधिक तापमानावर इंधनाचे ज्वलन झाल्यास त्याचे नायट्रोजन ऑक्साइड व नंतर कार्बन डायऑक्साइडमध्ये रूपांतर होते. तसेच, वाहनांच्या इंजिनमधून नायट्रोजन ऑक्साइडची निर्मिती होऊन वायू प्रदूषण होते. त्याचा श्वसननलिका व फुफ्फुसावर परिणाम होतो. - धुलिकण : हवेतील धुलीकणांचे १० मायक्रॉनपेक्षा लहान व त्यापेक्षा मोठे असे धुलिकणांचे वर्णन केले जाते. सुरू असलेली बांधकामे, कारखाने, शेतीतील कामे आदी कारणांमुळे धुलिकणांची निर्मिती होते. वाऱ्यामुळेही धूळ निर्माण होते असते.

- महापालिकेच्या पर्यावरण अहवालानुसार, शहरातील हवेतील कार्बन डायऑक्सइड, कार्बन मोनाऑक्साइड, सल्फर डायऑक्साईड, नायट्रोजन ऑक्साइड व धुलिकणांचे प्रमाण महाराष्ट्र प्रदूषण मंडळाच्या मानांकाच्या मर्यादेत आह. त्यासाठी पावसाळा, हिवाळा व उन्हाळा असा तीनही ऋतूंमध्ये मोशी कचरा डेपो, चिंचवड व कासारवाडी सांडपाणी प्रक्रिया प्रकल्पाजवळील हवेतील नमुन्यांची तपासणी केली जाते.

# महापालिकेच्या वृक्षांवर विद्युत रोषणाई करणे भोवले!

## संजय तिवारी यांच्याविरोधात निगडी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल

**पिंपरी-चिंचवड | न्यूज एक्सप्रेस मराठी।**

घरा समोरील महापालिकेच्या वृक्षांवर रोषणाई केल्याप्रकरणी संजय तिवारी यांच्याविरोधात निगडी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत पिंपरी महापालिकेचे सहायक उद्यान अधीक्षक राजेश



वसावे (वय ४३) यांनी फिर्याद दिली आहे. तिवारी यांनी निगडी प्राधिकरणातील आपल्या बंगल्यासमोरील महापालिकेच्या वृक्षांवर रोषणाई केली होती. ४ ते १७ नोव्हेंबरपर्यंत त्यांनी वृक्षांवर रोषणाई करत विद्रूपीकरण केले. त्यामुळे विद्रूपीकरण, पर्यावरण संरक्षण अधिनियमांतर्गत त्यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दरम्यान, या रोषणाईला पर्यावरणप्रेमींनी तीव्र आक्षेप घेतला होता. रस्तादुभाजक, पदपथावरील वृक्षांवर रोषणाई करत झाडांचे संवर्धन, शहर विद्रूपीकरण या नियमांचे उल्लंघन केल्याचा आरोप करत कारवाईची मागणी प्रशांत राऊळ यांनी केली होती. अखेर महापालिकेने गुन्हा दाखल केला आहे.

# पालिकेचा पर्यावरण अहवाल 'कट पेस्ट'

## प्रदूषण कसे कमी करणार, यावर आश्वासनांची खैरात

पुणे।
**न्यूज एक्सप्रेस मराठी।**
शहरात प्रदूषणाने कळस गाठला आहे, मात्र त्याचा महापालिकेवर काहीही परिणाम झालेला दिसत नाही. दर वर्षी प्रशासन पर्यावरण अहवाल प्रसिद्ध करते. मात्र, त्यात वायू प्रदूषणाची आकडेवारी आटोक्यात असल्याचे दाखवण्यात येते. सफर संस्था जे हवा प्रदूषण नोंदवते त्याचा साधा बोर्ड देखील पालिका लावत नाही. मात्र, अहवालात प्रदूषण कसे कमी करणार, यावर आश्वासनांची खैरात आहे. त्यामुळे संतप्त नागरिकांनी पर्यावरण अहवालाचे वर्णन 'कट पेस्ट' असेच केले आहे. दिल्लीनंतर पुणे शहरातील हवा प्रदूषण सर्वाधिक आहे. यंदाच्या दिवाळीत पुणे शहरात दिल्लीनंतर सर्वाधिक आतषबाजी झाली. त्यामुळे शहरातील हवा प्रदूषण हा पुन्हा चर्चेचा मुद्दा बनला आहे. शहरात पृथ्वी विज्ञान मंत्रालयाची सफर या संस्थेसह राज्य प्रदूषण मंडळ देखील हवा प्रदूषण मोजते. मात्र, रोजच्या या बदलांची नोंद महापालिकास्तरावर घेतली जात नाही. त्यांचा फक्त वार्षिक पर्यावरण अहवाल प्रसिद्ध होतो. त्यात सूक्ष्म व अतिसूक्ष्म धूलिकणांचे प्रमाण मर्यादेतच दाखवले जाते. त्यामुळे नागरिकांनी या अहवालावरच गंभीर आक्षेप घेत त्याचे 'कट पेस्ट' अहवाल, असे वर्णन केले आहे. असर या संस्थेच्या वतीने वर्षभरापूर्वी शहरातील वायू प्रदूषण मोजणार्‍या 'डिजिटल फुफ्फस'ची प्रतिमा जंगली महाराज रस्त्यावर लावण्यात आली होती.



हे फुफ्फुस पंधरा दिवसांतच काळे झाले. नागरिकांना यामुळे डिजिटल फुफ्फुसाने हवेची गुणवत्ता कशी आहे, हे कळत होते. मात्र, ते महापालिकेने काही दिवसांत हटवले. शहराच्या रोजच्या हवेची गुणवत्ता मोजणार्‍या संस्था शहरात असताना नागरिकांना सतर्क करण्यासाठी एक्युआय (एअर क्वालिटी इन्डेक्स) चा बोर्ड रोज लावायला हवा, असे जाणकारांचे म्हणणे आहे. पालिकेला केंद्र शासनाकडून मोठा निधी येतो, त्याचा हिशेब नागरिकांना पालिकेने द्यायला हवा, असेही मत नागरिकांनी व्यक्त केले आहे. शहरात सूक्ष्म धूलिकण (पी.एम.१०) व अतिसूक्ष्म धूलिकण (२.५) याचे प्रमाण खूप वाढलेले असतानाही याबाबतचा बोर्ड कुणी लावत नाही. महापालिकेच्या २०२२-२३ या वर्षाच्या पर्यावरण अहवालात सूक्ष्म व अतिसूक्ष्म धूलिकणांचे प्रमाण खूप कमी दाखवले आहे. सूक्ष्म धूलिकणांचे प्रमाण (पी.एम.-१०) हे केवळ ६० ते ७०, तर अतिसूक्ष्म धूलिकण (पीएम २.५) चे प्रमाण ७० ते १०० दाखवले आहे. प्रत्यक्षात सफर संस्थेच्या रोजच्या नोंदीनुसार शहरातील सरासरी हवेची गुणवत्ता १३२ ते १८० च्या दरम्यान आहे. शिवाजीनगरमधील हवेची गुणवत्ता सतत २०२ च्या वर आहे.

> "पुणे महापालिकेला केंद्र शासनाने पर्यावरण सुधारण्यासाठी किमान १०० कोटींच्यावर निधी दिला आहे. असे असताना कचर्‍याच्या गाड्यांवर ताडपत्री टाकली जात नाही. धूलिकणांचे प्रमाण कमी करण्यासाठी पालिकेकडून काहीच प्रयत्न होताना दिसत नाहीत. पुण्याची हवी इतकी कधीच खराब नव्हती. पालिकेने आता तरी उपाययोजना करावी. यासाठी नागरिकांना सोबत घ्यावे. त्यांना आम्ही सहकार्य करायला तयार आहोत.
> **–डॉ. उमेष कहाळेकर,**
> ज्येष्ठ नागरिक, वाघोली

> "नागरिकांना खरेतर प्रदूषणाची माहिती पालिकेने रोज द्यायला हवी. हवा प्रदूषणाचे डिजिटल बोर्ड शहरात लावायला हवेत. पण, सर्व खापर आपल्यावर फुटेल, या भीतीने अधिकारी ती जबाबदारी घ्यायला तयार नाहीत. पर्यावरण अहवालही सदोष वाटतो. मागच्या वर्षीचा अहवाल असतो त्यातच थोडेफार बदल केलेले असतात. याला आजच्या भाषेत 'कट पेस्ट रिपोर्ट' म्हणतात.
> **-संतोष पाटील,**
> ज्येष्ठ नागरिक, कर्वे रस्ता

# अजित पवारांच्या निवासस्थानासमोर ठिय्या आंदोलन

## बारामतीतील धनगर समाज आक्रमक

पुणे।
**न्यूज एक्सप्रेस मराठी।**
धनगर आरक्षणाच्या अंमलबजावणी साठी बारामतीतील धनगर समाज आक्रमक झाला आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या बारामतीतील सहयोग सोसायटी या निवासस्थानासमोर ठिय्या आंदोलन करत धनगर समाजाकडून जोरदार घोषणाबाजी करण्यात आली. धनगर समाजाला एसटी प्रवर्गातून आरक्षण मिळावे या मागणीसाठी बारामतीतील चंद्रकांत वाघमोडे हे मागील दहा दिवसांपासून उपोषणाला बसले आहेत. आजचा उपोषणाचा अकरावा दिवस आहे. सरकारने उपोषणकर्ते चंद्रकांत वाघमोडे यांच्या



उपोषणाकडे लक्ष न दिल्याने धनगर समाज आक्रमक झाला आहे. आज पासून महाराष्ट्रातील २८८ तर ४८ खासदारांच्या दारात शांततेच्या मार्गाने बसण्याच्या सूचना उपोषणकर्ते चंद्रकांत वाघमोडे यांनी महाराष्ट्रातील धनगर बांधवांना केल्या आहेत. याच पार्श्वभूमीवर आज उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या सहयोग सोसायटी या निवासस्थानासमोर ठिय्या आंदोलन करत राज्य व केंद्र सरकारच्या विरोधात जोरदार घोषणाबाजी केली. यावेळी पोलीस प्रशासनाकडून मोठा पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता.मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, अजित पवार, खासदार सुप्रिया सुळे यांच्यासह राज्य व केंद्र सरकारचा यावेळी घोषणाबाजी करत निषेध व्यक्त करण्यात आला.

### मोठा पोलीस बंदोबस्त तैनात

» धनगर समाजाला एसटी प्रवर्गातून आरक्षण मिळावे या मागणीसाठी बारामतीतील चंद्रकांत वाघमोडे हे मागील दहा दिवसांपासून उपोषणाला बसले आहेत. आजचा उपोषणाचा अकरावा दिवस आहे. सरकारने उपोषणकर्ते चंद्रकांत वाघमोडे यांच्या उपोषणाकडे लक्ष न दिल्याने धनगर समाज आक्रमक झाला आहे. याच पार्श्वभूमीवर आज उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या सहयोग सोसायटी या निवासस्थानासमोर ठिय्या आंदोलन करत राज्य व केंद्र सरकारच्या विरोधात जोरदार घोषणाबाजी केली. यावेळी पोलीस प्रशासनाकडून मोठा पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता.

# जरांगे पाटील योग्य दिशेने काम करत आहेत

## भुजबळ आणि जरांगे पाटील यांनी आपापसातील वाद मिटवावेत

**पुणे । न्यूज एक्सप्रेस मराठी।** मराठा समाजाला आरक्षण मिळाले पाहिजे. परंतु हे आरक्षण देताना इतर मागासवर्गीयांच्या (ओबीसी) आरक्षणाला धक्का लागू नये, अशी भूमिका केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले यांनी रविवारी मांडली. तसेच छगन भुजबळ आणि मनोज जरांगे पाटील यांनी आपापसातील वाद मिटवावेत, अशी अपेक्षाही आठवले यांनी व्यक्त केली. केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले यांनी रविवारी पुण्यातील शासकीय विश्रामगृह येथे पत्रकारांशी संवाद साधला. तमिळनाडूच्या धर्तीवर मराठा समाजाला आरक्षण मिळाले पाहिजे. ओबीसी कोट्यामधून मिळालेले आरक्षण हे कोर्टामध्ये टिकणार नाही. ओबीसी समाजाच्या आरक्षणाला धक्का न लागता मराठा समाजाला आरक्षण द्यावे यासाठी सरकारने प्रयत्न करावेत. मराठा समाजाला आरक्षण मिळावे, अशी भुजबळांचीही भूमिका आहे. त्यासाठी मनोज जरांगे पाटीलही योग्य दिशेने काम करत आहेत, असे आठवले म्हणाले. तसेच समाजातून जातीयवाद संपला पाहिजे. जातनिहाय जनगणना केली पाहिजे. त्यानुसार प्रत्येक जातीला आरक्षण मिळाले पाहिजे, असेही आठवले यांनी स्पष्ट केले. कोरेगाव भीमा येथे भव्य स्मारक व्हावे, यासाठी आम्ही अग्रेसर राहू. तसेच नवीन संसद भवनाला संविधान भवन असे नाव दिले जाईल, असेही आठवले म्हणाले. विश्वचषकाच्या अंतिम सामन्याचा संदर्भ घेत, मला इशारा देतं माझं वॉच, रोहित शर्माची टीम घेणार ऑस्ट्रेलियाच्या १० कॅच, का जिंकणार नाही आपण ही मॅच?, अशी खास आपल्या शैलीतील कविता आठवले यांनी ऐकवली. तसेच ही मॅच आपल्याला कोणत्याही परिस्थिती जिंकायची आहे. मोदींच्या टीमनेही चांगली तयारी केली आहे. मी राहुल गांधींचा कॅच घेणार आहे. मी त्यांना शून्यावर आऊट करणार आहे, असा टोलाही आठवले यांनी लगावला. मोदी ॲक्टिव्ह खेळाडू असून २०२४ मध्ये ३५० हून अधिक धावा करणार आहोत, असेही आठवले म्हणाले. मराठा समाजाला आरक्षण मिळाले पाहिजे, परंतु 'ओबीसी'च्या आरक्षणाला धक्का लागू नये, अशी भूमिका केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले यांनी रविवारी मांडली. छगन भुजबळ आणि मनोज जरांगे पाटील यांनी आपापसातील वाद मिटवावा आणि पुढे जाण्याचा प्रयत्न करावा, असा सल्लाही त्यांनी यावेळी दिला. पुण्यात आले असताना आठवले यांनी पत्रकारांशी संवाद साधला. मराठा समाजाला आरक्षण देण्याबाबत आठवले यांनी आपली भूमिका स्पष्ट केली. यावेळी परशुराम वाडेकर, बाळासाहेब जानराव, मंदार जोशी, वीरेन साठे आदी पक्षाचे प्रमुख पदाधिकारी उपस्थित होते. ओबीसी समाजाच्या आरक्षणाला धक्का न लागता मराठा समाजाला आरक्षण देण्यासाठी सरकारने प्रयत्न करावे, असे सांगून आठवले म्हणाले, ''मराठा समाजाला आरक्षण मिळावे यासाठी छगन भुजबळ देखील आग्रही आहे. मराठा समाजाला आरक्षण मिळावे यासाठी जरांगे पाटील यांचे योग्य असे काम चालू आहे. जातीयवाद समाजातून संपला पाहिजे. जातीनिहाय जनगणना केली पाहिजे आणि त्यातून लोकसंख्येनुसार प्रत्येक जातीला आरक्षण मिळावे, ही आमची भूमिका आहे. तमिळनाडूच्या धर्तीवर मराठा समाजाला आरक्षण मिळाले पाहिजे, 'ओबीसी'मधून मिळालेले आरक्षण हे न्यायालयात टिकणार नाही. भीमा कोरेगाव येथे भव्य स्मारक व्हावे, यासाठी आमचा समाज अग्रेसर राहणार आहे, असे सांगून आठवले म्हणाले, ''पुढील वर्षी होणाऱ्या लोकसभा निवडणुकीमध्ये जर आमचे सरकार आले, तर भारत महासत्ता बनल्याशिवाय राहणार नाही. नवीन संसद भवनला दिल्ली येथे संविधान भवन असे नाव देणार आहोत.'



### तर राऊतांना पासपोर्ट देऊ

» शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाचे नेते संजय राऊत यांच्याबद्दल विचारले असता, रामदास आठवले म्हणाले, ''राऊत यांचा पासपोर्ट हरवला असेल, तर आम्ही त्यांना देऊ. २०१४ नंतर त्यांना बाहेर जावे लागणार आहे. त्यांचा पासपोर्ट आम्ही जप्त करणार नाही.''

# माफी मागितली नाही म्हणून सांगून काळं फासलं!

## पवारांची बदनामी करण्याचा प्रयत्न केला तर तोंडाला काळे फासण्यात येईल

**पुणे । न्यूज एक्सप्रेस मराठी।** राष्ट्रवादीचे अध्यक्ष शरद पवार यांच्यावर आरोप करणाऱ्या नामदेव जाधव यांच्या विरोधात राष्ट्रवादी काँग्रेस आक्रमक झाल्याचं पाहायला मिळालं. पवारांवर सततचे आरोप केल्याने राष्ट्रवादीच्या कार्यकर्त्यांनी त्यांच्या चेहऱ्याला काळं फासलं आहे. त्यामुळे काही वेळ तणावाचं वातावरण निर्माण झालं आहे. भांडारकर इन्स्टिट्यूटमध्ये त्यांचा कार्यक्रम होता. मात्र या कार्यक्रमासाठी परवानगी नाकारली गेली होती. मात्र कार्यकर्त्यांनी एरंडवणे परिसरात जाधवांना गाठलं आणि त्यानंतर त्यांनी जाधवांच्या फोटोला काळं फासलं. मागील काही दिवसांपासून नामदेव जाधव हे शरद पवार यांच्यावर टीका करत आहे. शाळेत असताना गैरमार्गाने गुण वाढवले म्हणून नामदेव जाधव यांना विद्यार्थी, पालक व शाळा प्रशासनाने धक्के मारून शाळेतून हाकलून लावलं होतं. नामदेव जाधवच्या विरोधात विक्रोळी पोलिस स्टेशनमध्ये खंडणीचा गुन्हाही दाखल आहे. सध्या ते जामीनावर आहे. ते राज्य सरकारमधील एका मंत्र्याकडून सुपारी घेऊन शरद पवार यांच्यावर टीका करत आहे, असा आरोप राष्ट्रवादीने केला आहे. नामदेव जाधवच्या हा हेतूत राज्यात ओबीसी विरूध्द मराठा असा असा संघर्ष उभा करत आहे. १९८३ साली शरद पवार मुख्यमंत्री असताना ओबीसी आरक्षण लागू झालं अशी बतावणी हे नामदेव जाधव करत आहे. वास्तविक पाहता १९८३ साली पवार विरोधीपक्षनेते होते तर ओबीसी आरक्षण हे १९९० च्या दशकात देण्यात आले आहे. म्हणूनच नामदेव जाधव करत असलेले आरोप खरे असतील तर त्यांनी पुरावे उघड करावेत अन्यथा पवार जाहीर माफी मागावी असा ईशारा आम्ही नामदेव जाधवला दिला होता. अन्यथा त्याच्या तोंडाला काळे फासण्यात येईल अशी पूर्वसूचनाही दिली होती. असं असतानाही नामदेव जाधवने पुरावे सादर केले नाहीत, पवारांची माफीही मागितली नाही, असेदेखील आरोपी त्यांनी केले नाही. केवळ प्रसिद्धीसाठी किंवा एखाद्या राजकीय पक्षाकडून सुपारी घेऊन कोणत्याही पुराव्याशिवाय पवारांवर टीका करणाऱ्या लोकांना आम्ही नामदेव जाधवच्या माध्यमातून इशारा देऊ इच्छितो की यापुढे कोणीही शरद पवारांची बदनामी करण्याचा प्रयत्न केला तर त्याच्याही तोंडाला काळे फासण्यात येईल, असा इशारा राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे पुणे शहराध्यक्ष प्रशांत जगताप यांनी दिला.



